RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक २६(२)] बुधवार, मार्च २, २०२२/फाल्गुन ११, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ७२

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ मार्च, २०२२.

### अधिसूचना

**खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक गौखनि/०३२१/प्र.क्र. १०९/ख-२.—खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम १५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३(यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम ९ उप-नियम (१) मधील दुसऱ्या परंतुकामधील " परंतु, आणखी असे की, आपला खाणकामाचा पारंपरिक व्यवसाय चालू ठेवण्यास इच्छुक असणाऱ्या कुंभार आणि वडार समाजाच्या कुंटुंबाच्या बाबतीत अर्ज केल्यावर " या मजकूरानंतर " स्फोटके वापरून अथवा स्फोटकाशिवाय " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

३. मुख्य नियमांच्या नियम ६७ च्या उप-नियम (२) मध्ये खालीलप्रमाणे परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु असे की, केंद्र अथवा राज्य शासनाच्या पायाभूत अथवा जलसंपदा प्रकल्पाच्या कामाकरिता विभागीय आयुक्त यांना आवश्यकता वाटल्यास रात्रीच्या वेळी गौण खनिजाच्या उत्खननाची व वाहतुकीची परवानगी देता येईल. "

४. मुख्य नियमांच्या नियम ७८ नंतर पुढीलप्रमाणे नवीन नियम ७८-अ समाविष्ट करण्यात येईल :—

" ७८-अः गौण खनिजाच्या वाहतुकीसाठी सेवा शुल्क - " गौण खनिजाचा वाहतुकदार किंवा भाडेपट्टीधारक राज्य सरकारला प्रति मेट्रिक टन किंवा प्रति ब्रास गौण खनिजाचे असे सेवा शुल्क अदा करील, जे शासनाकडून वेळोवेळी **राजपत्रातील** आदेशाद्वारे विनिर्दिष्ट केले जाईल.

५. मुख्य नियमांच्या नियम ८२ मध्ये :—

(१) उप-नियम (१) च्या खंड (ड) मधील उप खंड (दोन) मध्ये " विभागीय आयुक्ताकडे " या शब्दानंतर " किंवा अपर विभागीय आयुक्ताकडे " हे शब्द समाविष्ट करण्यात येईल;

(२) उप-नियम (२) मध्ये " विभागीय आयुक्ताने" या शब्दानंतर " किंवा अपर विभागीय आयुक्ताने" हा शब्द समाविष्ट करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमेश चव्हाण,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 02nd March, 2022

*NOTIFICATION*

MINES AND MINERALS (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1957.

No.Gaukhani/0321/C.R.109/Kh-2.—In exercise of the powers conferred by section 15 of the Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957 (67 of 1957) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) (Second Amendment) Rules, 2022.

2. In rule 9 of the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rules (*1*), in the second proviso, after the words " wish to do such mining" the words, " with or without blasting," shall be inserted.

3. In rule 67 of the principal Rules, in sub-rule (*2*), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, the Divisional Commissioner may, if it is found necessary, allow mining and transportation of minor minerals during night time, for the infrastructure or irrigation project of the Central Government or the State Government."

4. After rule 78 of the principal Rules, the following rule shall be inserted, namely :—

" **78-A. Services charges for transporting of minor mineral**.— A transporter or lease holder of the minor mineral transported in the State shall pay to the State Government such service charges per metric ton or per brass of the minor mineral as may be specified by the Government by an Order in the *Official Gazette,* from time to time. ".

5. In rule 82 of the principal Rules,—

(*i*) in sub-rule (*1*), in clause (*ii*), after the words " Divisional Commissioner " the words " or Additional Divisional Commissioner " shall be inserted ;

(*ii*) in sub-rule (*2*), after the words " Divisional Commissioner " the words " or Additional Divisional Commissioner " shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMESH CHAVAN,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.